दणदणीत झाली रॅली...

आज खणखणीत 'रास्ता रोको'

पनवेल : रामप्रहर वृत्त

खारघरच्या टोलपासून पनवेलच्या जनतेची मुक्ती झालीच पाहिजे, या मागणीसाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवारी (दि. ११) सकाळी १० वाजता खारघर येथे 'रास्ता रोको' करण्यात येणार आहे. या आंदोलनाची जय्यत तयारी झाली असून उद्या सकाळी ९.३० पर्यंत कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कामोठे येथील जनसंपर्क कार्यालयात उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

खारघरचा टोल रद्द व्हावा किंवा पनवेलच्या जनतेची या जाचक टोलपासून सुटका व्हावी, या मागणीसाठी आमदार प्रशांत ठाकूर सुरुवातीपासून सातत्याने पाठपुरावा करीत आहेत. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडे या संदर्भात सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असून लवकरच या संदर्भात बैठक होऊन सकारात्मक निर्णय होईल, अशी अपेक्षा आहे. जोपर्यंत यावर तोडगा काढण्यात येत नाही, तोपर्यंत टोलविरोधात आंदोलन सुरुच राहणार आहे.

खारघर टोलनाका हा येथील जनतेवर अन्याय करणारा असून त्याला आमचा तीव्र विरोध आहे. हा अन्यायकारक खारघर टोलनाका रद्द व्हावा अशी आमची मागणी आहे. त्यासाठी आपल्याला रस्त्यावर उतरावे लागले आहे. जनतेच्या प्रश्नावर आपल्या रोज रस्त्यावर उतरावे लागले तरी आपण रोज रस्त्यावर उतरू पण जनतेला न्याय मिळवून दिल्याशिवाय शांत बसणार नाही असे स्पष्ट प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी जनजागृती रॅलीला संबोधित करताना केले.

या रॅलीत पनवेल तालुका काँग्रेस कार्याध्यक्ष अरूणशेठ भगत, पनवेल शहर काँग्रेसचे अध्यक्ष जयंत पगडे, जि.प. पक्ष प्रतोद राजेंद्र पाटील, उपनगराध्यक्ष मदन कोळी, सभापती अनिल भगत, नगरसेवक कार्यकर्ते, विविध समित्यांचे अध्यक्ष पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या वेळी मार्गदर्शन करताना आमदार प्रशांत ठाकूर पुढे म्हणाले की, सरकारचे निर्णय हे अधिकाऱ्यांच्या रिपोर्टवर होत असतात. खारघर टोल नाक्यासंबधी चुकीच्या रिपोर्टमुळे पनवेल, कामोठा कळंबोलीसह रायगडच्या जनतेला नाहक टोलचा भुर्दंड भरावा लागणार आहे. त्यामुळे ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून देऊन हा अन्यायकारक टोल रद्द करावा यासाठी सुरूवातीपासून मागणी केली. परंतु ती मान्य झाली नाही त्यामुळे जनतेच्या हितासाठी आपल्याला रस्त्यावर उतरावे लागत आहे.खारघर टोलनाका हा येथील जनतेवर अन्याय करणारा असून त्याला आमचा तीव्र विरोध आहे. या रॅलीत काँग्रेसच्या कार्यकर्त्यांसह परिसरातील नागरीकही मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अध्यक्ष माणिकराव ठाकरे, उपाध्यक्ष मुश्ताकभाई अंतुले, लोकनेते रामशेठ ठाकूर, पनवेल तालुकाध्यक्ष लक्ष्मणशेठ पाटील, कार्याध्यक्ष अरुणशेठ भगत, इंटकचे प्रदेश कार्याध्यक्ष महेंद्र घरत, शहर काँग्रेसचे अध्यक्ष जयंत पगडे, माजी नगराध्यक्ष सईद मुल्ला, जिल्हा परिषदेचे पक्षप्रतोद राजेंद्र पाटील, उपनगराध्यक्ष मदन कोळी, नगरसेवक संतोष शेट्टी, गणेश पाटील, गणपत म्हात्रे, शिक्षण सभापती एकनाथ गायकवाड, महिला व बालकल्याण सभापती निता माळी, विभागीय अध्यक्ष प्रभाकर जोशी, बुधाजी ठाकूर, विलास फडके, सुधीर मोरे, सुहास पाटील, राजाभाऊ दवे, पवन सोनी, झाकीर खान, योगेश लहाणे, प्रितम म्हात्रे, आनंद ढवळे, सतिश पाटील, संजय ननावरे, ग्राहक हित कक्षाच्या तालुकाध्यक्ष दर्शना भोईर, महिला काँग्रेसच्या तालुका कार्याध्यक्षा रत्नप्रभा घरत आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

'टोल नाका रद्द करा'ची घोषणा सर्वत्र दुमदुमली

पनवेल : रामप्रहर वृत्त

'टोल नाका रद्द करा, रद्द करा, टोल माफी मिळालीच पाहिजे, जाचक टोल रद्द करा, प्रशांत ठाकूर आगे बढो हम तुम्हारे साथ है' या घोषणांनी पनवेल, नवीन पनवेल, खांदा कॉलनी, कळंबोली, कामोठे, खारघर परिसर दुमदुमला.

टोल विरोधात जनजागृती करण्यासाठी गुरुवारी (दि. १०) पनवेल काँग्रेसच्या मध्यवर्ती कार्यालयापासून दुपारी जनजागृती रॅली काढण्यात आली. या रॅलीला उदंड प्रतिसाद मिळाला भर पावसात या रॅलीला उदंड प्रतिसाद मिळाला. दुचाकी, चारचाकी वाहनांवर प्रत्येक विभागाती शेकडो कार्यकर्ते या रॅलीत सहभागी झाले होते. रॅलीचा समारोप खारघर येथील शिल्पचौकात रात्री ८ वाजण्याच्या सुमारास झाला.